निशाणी क्रं ५ वरील आदेश
(पारित दि ०८/०४/ २०२१)

१. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ (यापुढे “संहिता”) चे आदेश ३९ नियम १ नुसार प्रतिवादी नं ४ व ५ यांनी दावा मिळकती मध्ये कोणत्याही प्रकारचा हक्क व बोजा निर्माण करु नये, तसेच बदल करु नये व दावा मिळकत त्रयस्थ इसमास हस्तांतरित करु नये, असा तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यासोबतचे प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले. प्रतिवादी नं ४,५ यांनी या अर्जास दिलेले म्हणणे (नि.क्रं.२१) चे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी तर्फे विधिज्ञ श्री.ए.सी.जाधव व प्रतिवादी नं ४ व ५ तर्फे विधिज्ञ श्री. एम.डी.तांबेकर यांचा युक्तीवाद ऐकला.

३. वादीचे थोडक्यात असे कथन आहे की, मौजे.वेळु येथील गट नं २६०/१ याचे क्षेत्र ०हे ४०आर ही मिळकत वादी व प्रतिवादी नं १ यांचे वडिलोपार्जित मालकी व वहिवाटीची आहे (यापुढे ‘वाद मिळकत’). वादी यांची आई मिना शांताराम हांडे या मयत आहेत. प्रतिवादी क्रं. १ हि कै.मिना यांची सख्खी बहिण आहे. प्रतिवादी नं १ यांची आई लक्ष्मीबाई मयत आहेत. कै.मिना व शारदा यांचे वडिल भानुदास धोंडिबा पांगारे हे मयत आहेत. कै.भानुदास यांना वाद मिळकती ही त्यांचे भावामधील वाटपाने आलेली होती. प्रतिवादी नं २ हे प्रतिवादी नं १ यांचे पती आहेत. सन २००२ मध्ये प्रतिवादी नं २ यांनी वादी यांचे आईची संमती न घेता कै.भानुदास यांच्याकडुन वाद मिळकतीचे खरेदी खत त्यांचे हक्कात नोंदवुन घेतले. सदरचे खरेदी खत हे बिना कब्जाचे व बिना भरणाचे होते. या कारणाने सदरचे खरेदीखत हे वादी यांचे हक्कावर बंधनकारक नाही. प्रतिवादी नं २ यांनी

वाद मिळकती सन २००७ मध्ये प्रतिवादी नं ३ यांना विक्री केली. पुढे प्रतिवादी नं ३ यांनी वाद मिळकत प्रतिवादी नं ४ व ५ यांना सन २००८ मध्ये विक्री केली. कै.मिना यांचे वारस म्हणुन सदरचा दस्त वादी यांचेवर बंधनकारक नाही. प्रतिवादी नं ४ व ५ यांचे नावाची नोंद महसुल अभिलेखास ७/१२ उता-यास झाल्याने ते वाद मिळकत विक्री करण्याच्या तयारीत आहेत. वाद मिळकतीचे अद्याप सरस निरस मनाने वाटप झालेले नाही. वाद मिळकत ही वादी यांचे ताबे वहिवाटीस आहे. प्रतिवादी यांनी वाद मिळकत विक्री केल्यास दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होणार आहे. तसेच दाव्याचे सुनावणीस विलंब होउन वादीचे नुकसान होणार आहे. करिता हा अर्ज.

४. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे मध्ये वादीचे कथन नाकारले आहे. या प्रतिवादीचे कथन आहे की, वादीचा दावा मुदत बाहय आहे. दाव्यामधील नमुद खरेदीखते यास आव्हान न झालयाने सदरचे खरेदी खते कायदेशीर आहेत. या प्रतिवादींनी या खरेदीखतावरील संपुर्ण मोबदला देउन त्याच दिवशी वाद मिळकत ताब्यात घेतली आहे. हे प्रतिवादी प्रामाणिक खरेदीदार आहेत. वाद मिळकतीमध्ये वादीचा कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबध नाही. शेवटी हा अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली.

५. अभिलेखाचे अवलोकन केले. विशेषतः वादी तर्फे दि.०६/०४/२०२१ रोजी दिलेला अर्ज (नि.क्र २६)चे अवलोकन केले असता, दि. ३१/०३/२१ रोजी प्रतिवादी नं.४,५ यांनी संपुर्ण वाद मिळकत विक्री केली असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. या अनुषंगाने वादी तर्फे विधिज्ञ यांनी युक्तीवादादरम्यान सांगितले की, प्रतिवादी नं४,५ यांनी त्यांचे म्हणणेमध्ये वाद मिळकत विक्री करणार नाही असे स्पष्टपणे कथन केले आहे. परंतु फेरफार नं ४५७४ अन्वये प्रतिवादी यांनी दि. ३१/०३/२०२१ रोजी सदरची मिळक्त अनंत यशवंतराव

राजेशिर्के व इतर ३ असे ४ व्यक्तींना विक्री केली आहे. त्याच दिवशी गाव कामगार तलाठी, वेळु यांनी सदर खरेदीखताची नोंद फेरफार नं ४५७४ अन्वये मंजुर केली आहे. यावरुन खरेदी घेणार हे आणखी पुढे वाद मिळकत विक्री करु शकतात. त्यांनी दि. ३१/०३/२०२१ रोजीच्या खरेदीखताची नोंद ७/१२ उता-यास होउ नये असा आदेश या अर्जामध्ये पारित करण्याची मागणी केली. त्यांनी पुढे असे सांगितले की, वाद मिळकत वडिलोपार्जित आहे. त्यामध्ये वादीस सकृतदर्शनी हक्क व हितसंबध आहे. आणखी वाद मिळकत विक्री झाल्यास दाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होणार आहे. या विरुध्द प्रवितादी नं ४ व ५ तर्फे विधिज्ञ यांनी युक्तीवादा दरम्यान सांगितले की, वादीने वाद खरेदीखते रद्द करण्याची मागणी केलेली नाही. महसुल अभिलेखास खरेदीखताची नोंद घेउ नये असा आदेश या न्यायालयास देता येणार नाही.

६. या अर्जाचे अवलोकन कले असता वादीची मुख्य मागणी ही प्रवितादी नं ४ व ५ यांचे बाबत आहे. परंतु वादी यांचा युक्तीवाद व अर्ज (नि.क्र २६) नुसार दि. ३१/०३/२०२१ रोजी वाद मिळकत प्रतिवादी नं ४ व ५ यांनी अर्ज (नि.क्र २६) सोबत जोडलेला फेरफार ४५७४ नुसार अनंत यशंवतराव राजेशिर्के, राजेंद्र साहेबराव घाटगे, राहुल शिवाजी पांगारे व सुवर्णा सुदाम आरखडे यांना रोजी विक्री केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. वादी यांना वाद मिळकतीमध्ये सकृदर्शनी हक्क व हितसंबध आहे काय किंवा वाद मिळकत वादीचे एकत्रीत कुटुंबाची तसेच वडिलोपार्जित आहे काय, या बाबी प्रतिवादी नं ४ व५ यांना वाद मिळकत विक्री केल्याने या अर्जाच्या वेळी विचारात घेणे उचित नाही. कारण या वरील मुदयास सकृतदर्शनी निष्कर्ष नोंदविल्यास व वादी यांचा अर्ज मागणी प्रमाणे मंजुर झाल्यास त्याची अंमलबजावणी प्रतिवादी नं ४ व ५ यांचे विरुध्द करता येणार नाही. या अर्जावर आज रोजी आदेश होत असल्याने आज रोजीची परिस्थिती विचारात घेणे

आवश्यक आहे.

७. सर्व प्रथम युक्तीवादा दरम्यान वादी तर्फे दि. ३१/०३/२०२१ रोजीचे खरेदीखताची नोंद वाद मिळकतीचे महसुल अभिलेखास घेउ नये असा अंतरिम आदेश करण्याची मागणी केली आहे. वाद मिळकत हि शेत जमिन असल्याने त्याचा अभिलेख महसुल विभागा मार्फत अद्यावत करण्यात येतो. परंतु महसुल विभाग हा राज्य शासनाचा भाग असल्याने या न्यायालयास वादी यांचे मागणी प्रमाणे आदेश देणे ही बाब न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येत नाही. या अनुषांगाने माझे मते वादीची ही मागणी या अर्जाच्या कक्षेत येत नाही. प्रतिवादी नं ४ व ५ यांनी वाद मिळकत विक्री केली असल्याने आता या अर्जानुसार त्यांचे विरुध्द आदेश पारित करणे उचित नाही. किंबहुणा, तसा आदेश झाल्यास त्याची अंमलबजावणी करता येणार नाही. वादीची इतर कोणतीही मागणी इतर प्रतिवादी अथवा वर नमुद केल्या व्यतिरक्त नाही.

८. वादी यांचे कथनाप्रमाणे वाद मिळकत विक्री झाल्यास गुंतागुंत होणार आहे व दाव्याचे सुनावणी पुढे जाणार आहे, हे सकृतदर्शनी दिसुन येते. परंतु वरील खरेदी घेणार ४ व्यक्तींना वादींनी पक्षकार म्हणुन शामील केले नाही अथवा त्यांचे विरुध्द कोणतीही मागणी या दाव्यात केलेली नाही. खरेदी घेणार वर नमुद ४ व्यक्ती यांचे विरुध्द मागणी नसल्याने व ते दाव्यात सामाविष्ट नसल्याने त्यांना ऐकण्याची संधी न देता त्यांचे विरुध्द आदेश पारित करणे उचित होणार नाही. वरिल प्रमाणे परिस्थिती असताना वादीने योग्य ती दखल न घेता या अर्जावर सुनावणी घेतली आहे. तसेच महसुल अभिलेखास खरेदी खताची नोंद होउ नये, ही बाब अर्जामध्ये नमुद नसतानाही सदर आदेशाची मागणी केली आहे. परंतु वर विवेचन केल्याप्रमाणे सदरची बाब ही या न्यायालयाचे कार्यक्षेत्रामध्ये येत नाही. वरील विवेचन व प्रतिवादी नं ४ व ५ यांनी मिळकत विक्री केली आहे ही बाब

विचारात घेउन वादी यांना सकृतदर्शनी बाजु आहे काय, न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय या व अशा बाबीवर निष्कर्ष न नोंदविता वादी यांना कायदया प्रमाणे योग्य ती पुढे दखल घेण्याची मुभा देणे उचित वाटते. करिता वरिल विवेचनावरुन खालील आदेश परित करण्यात येतो.

आदेश

१. अर्ज (नि.क्र ५) नामंजुर करण्यात येतो.

२. वादी यांना या आदेशामध्ये विवेचन केल्याप्रमाणे योग्य ती दखल घेण्याची मुभा आहे.

३. अर्जाचा खर्च दाव्यामध्ये सामाविष्ट.

सही/-

(खुल्या न्यायालयात घोषित) (स.का.मुळे)

दि.०८/०४/२०२१ दिवाणी न्यायाधीश क.स्तर,भोर.